नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक २५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.३५ वाजता** मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून दिनांक **१९/०३/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचार करण्याकरिता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि (१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ४. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ५. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ६. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ७. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ८. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ९. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १०. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| ११. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १२. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १३. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १४. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १५. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १६. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १७. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १८. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १९. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २०. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २१. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २२. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २३. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २४. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २५. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २६. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| २७. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| २८. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| २९. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ३०. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ३१. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ३३. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ३४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ३५. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ३६. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ३७. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ३८. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ३९. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ४०. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ४१. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ४२. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ४३. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ४४. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ४५. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ४६. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ४७. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ४८. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ४९. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ५०. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ५१. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ५२. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ५३. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ५४. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ५५. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ५६. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ५७. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ५८. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ५९. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ६०. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ६१. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ६२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ६३. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ६४. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| २. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ३. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ४. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ५. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ६. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ७. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ८. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ९. | ५ | अ | रिक्त | |
| १०. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ११. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १२. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १३. | ८ | ब | रिक्त | |
| १४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १६. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| १७. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १८. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १९. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| २०. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २१. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २२. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २३. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २४. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २५. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २६. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २७. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २८. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २९. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३०. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३१. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ३२. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३३. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३४. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ३५. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३६. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३७. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३८. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ३९. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ४०. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४१. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ४२. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ४३. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ४४. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ४५. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ४६. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ४७. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ४८. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ४९. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ५०. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ५१. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ५२. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ५३. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ५४. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ५५. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ५६. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ५७. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ५८. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ५९. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ६०. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ६१. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ६२. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ६३. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ६४. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ६५. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ६६. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ६७. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ६८. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ६९. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ७०. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ७१. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ७२. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ७३. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ७४. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ७५. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ७६. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ७७. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ७८. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ७९. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ८०. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ८१. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ८२. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ८३. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ८४. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ८५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ८६. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ८७. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ८८. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ८९. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ९०. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ९१. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| ९२. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

वंदेमातरमनंतर सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.

(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)

**ठराव क्रमांक ५५ :-** मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

**प्रतिमा बोंडे/रोशनी रिंके**

दिव्यांग खेळाडू प्रतिमा कृष्णराव बोंडे हिने नुकतेच बंगलुरू येथे झालेल्या राष्ट्रीय पॅरावेटलिफ्टींग स्पर्धेत 50 किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले. तर रोशनी प्रकाश रिंके हिने 55 किलो वजन गटात कास्य पदक प्राप्त केले. मा. महापौरांनी दिव्यांगांसाठी विविध योजनांची घोषणा केली होती त्या अनुषंगाने मा. महापौरांनी पुढाकार घेवून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या दोन्ही दिव्यांग खेळाडूंना उपरोक्त स्पर्धेसाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे प्रत्येकी 15 हजार रूपये आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे. अश्याप्रकारे सहाय्य करणारी नागपूर महानगरपालिका ही एकमेव ठरली आहे. प्रतिमा बोंडे ही थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होईल.

या दोन्ही एकलव्य राज्य पुरस्कार प्राप्त खेळाडूंचे यश नागपूरसाठी अभिमानास्पद असून नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## अल्फिया पठाण

भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या रोहतक येथील बॉक्सींग अकादमीत भारतीय संघ निवड चाचणीत 81 किलो वजन गटात नागपूरची युवा मुष्टीयोध्दा अल्फिया अक्रमखान पठाण हिची आगामी युथ वुमेन वर्ल्ड चॅम्पीयनसाठी निवड झाली. ही स्पर्धा दि. 10 ते 24 एप्रिल कालावधीत पोलंड येथे होणार आहे. नागपूरसाठी ही अभिमानास्पद असून नागपूर महानगरपालिकेची ही सभा तिचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## लीना चुटे

सिकई मार्शल आर्ट राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लीना संतोष चुटे हिने सुवर्ण पदक प्राप्त केले त्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर :- निगम सचिवांकडे जी सूचना प्राप्त झाली आहे ते सभागृहाला अवगत करावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, सन्माननिय सभागृह, सहा.संचालक नगररचना यांच्याकडुन एक पत्र प्राप्त झाले आहे त्यामध्ये विषय असा आहे की मौजा सिताबर्डी येथील नगरभुमापन क्र १६१२ शिट क्र १७ क्षेत्र २८८७.४९ चौरस मिटर लोककर्म विभागाची जागा महापौर नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना बंगल्याकरीता नागपूर शहरात जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आहे. यामध्ये चेंजेस करुन करेक्शन केले आहे. उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की मौजा सिताबर्डी येथील नगरभुमापन क्र १६१२ शिट क्र १७ क्षेत्रफळ २८८७.४९ चौरस मिटर लोककर्म विभागाची जागा महापौर नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना बंगल्याकरीता नागपूर शहरात जागा उपलब्ध करुन देण्याबाबत ठराव घेण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता तथापि वरील प्रस्तावामध्ये जागेच्या क्षेत्रात २८८७.४९ चौरस मिटर ऐवजी २८८८४.९० चौरस मिटर जागेपैकी ५२५० चौरस मिटर जागा क्षेत्राबाबत दुरुस्ती असुन या कामाच्या प्रस्तावाच्या क्षेत्राबाबत नोंद घेण्याकरीता त्यांनी विनंती केलेली आहे.

महापौर :- समस्त सदस्यांनी निगम सचिवांनी दिलेली सूचनाप्रमाणे तो विषय व्यवस्थित करावा. निगम सचिवांना सूचित करतो की त्यांनी लक्षवेधी सुचनेचे वाचन करावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, सन्माननिय सभागृह, आपल्याकडे दोन लक्षवेधी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामध्ये विषय आहे की नागपूर महानगरपालिकेच्या १९-०३-२०२१ रोजी होणा-या सर्वसाधारण सभेकरीता सभा कामकाज नियमावली कलम १६ नियम क्र १ एक्स अन्वये लक्षवेधी. ही लक्षवेधी मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. उपायुक्त महसुल मालमत्ता आणि सहा.अधिक्षक/राजस्व निरीक्षक हनुमाननगर झोन यांनी नियमबाहय गैरकायदेशीर केलेल्या कामाबाबत लक्षवेधी आहे.

महापौर :- नियमाप्रमाणे सन्माननिय सदस्य ज्यांनी लक्षवेधी लावलेली आहे श्री.प्रविणजी दटके यांनी आपले भाष्य करावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मी ०९-०२-२०२१ या दिवशी एक पत्र पुराव्यासहित मा.आयुक्तांकडे या विषयाच्या संदर्भात पत्र दिले होते आणि त्याबाबत मी पुरावे दिले होते. त्या संदर्भात काल रात्री मला एक पत्र मिळाला आहे, संध्याकाळी ६.३० नंतर माझ्या घरी एक पत्र आले. त्या पत्रावर आपले अतिरिक्त आयुक्त श्री जलज शर्मा यांची सही आहे. या पत्रामध्ये त्यांनी १,२,३ आणि ४ मुद्यावर त्यांनी ही कार्यवाही करावी, ती कार्यवाही करावी, याच्यावर हा

अहवाल मागवावा, तो अहवाल मागवावा मी पत्र देवुन मा.महापौरजी दिड महिना होत आहे आणि या दिड महिन्यात जर टॅक्स सारख्या संवेदनशील विषयावर कार्यवाही होत नसेल तर या महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल आणि दुसरा माझा विषय असा आहे कि ज्यांनी जाली पासवर्ड व युजर आयडी टाकुन संबंधित अधिका-यांनी, कर्मचा-यांनी जो काही टॅक्स कमी केले, त्यांचा तो वार्ड नव्हता त्यांचा ते झोन नव्हते तरी त्यांनी जाली आयडी पासवर्ड वरुन अनेक लोकांचे टॅक्स कमी केले, यामधुन भ्रष्टाचार करण्याचा प्रयत्न केला. युजर आयडीचा मिसयुज केला. महानगरपालिकेला मिळणा-या उत्पन्नात कुठे तरी खंड आणला, आणि याचे अमाउंट अंदाजे १० ते २० कोटी रुपये आहे. आणि मा.महापौरजी ज्यांचे ज्यांचे युजर आयडी पासवर्ड आपण बदलले आहे त्यांचे कागद माझ्याकडे आहे मी तुम्हाला वाचुन दाखवतो. आपल्या आयटी विभागानी दिलेले ही माहिती आहे कि कोणा कोणाची युजर आयडी वापरुन किती लोकांचे टॅक्स वेगवेगळया झोनमध्ये कमी करण्यांत आले आहे. मा.महापौरजी, गांधीबाग झोनच्या एका कर्मचा-यांला टारगेट करुन त्या विभागाचे जे उपायुक्त आहे त्यांच्याकडे त्यांनी तक्रार केली कि, एका मानसांवर सस्पेशनची कारवाई केली आहे. त्यामध्ये रिटायर्ड झालेल्या लोकांचे युजर आयडी वापरुन टॅक्स कमी करण्यांत येत आहे, या महानगरपालिकेत सर्वच्या सर्व रेव्हेन्यु विभाग फक्त एका सहा.आयुक्तांकडे कसे देण्यांत आला आहे. त्यांच्याकडे कर आहे, बाजार आहे, स्थावर आहे, बाजार आहे, जाहिरात आहे, आणि शासनाकडुन आलेल्या अधिका-यांना हा विभाग न देता फक्त एका सहा.आयुक्तांकडे व उपायुक्तांकडे सर्वचे सर्व उत्पन्नाचे विभाग देण्यांत आले आहे, त्यांच्याकडे एलबीटी आहे, तरी या विभागात काय चालु आहे, मा.महापौरजी, एलबीटी सारखे गंभीर विषय आहे, लोकांचे अकाउंट सीझ करायचे, त्यांना बोलवायचं, मग त्यांच्याशी बोलून त्यांचे अकाउंट तुरंत रिलीज करुन देण्यांत येत आहे. यामध्ये मोठा घोटाळा आहे. माझी आपणांस विनंती आहे कि, सभागृहाची चौकशी समिती करुन या विषयाच्या संदर्भात पुढच्या सर्वसाधारण सभेपर्यंत चौकशी करावी तोपर्यंत संबंधित विभागाचे जे काही सहा.आयुक्त आहे, त्यांच्याकडुन सर्व विभागाचे चार्ज काढुन जलज शर्मा असतील, मा.अति.आयुक्त असतील किंवा शासनाकडुन आलेले उपायुक्त असतील त्यांच्याकडे हे चार्ज देवुन याची चौकशी सभागृहाच्या ज्येष्ठ मा.सदस्यांमार्फत एक समिती तयार करुन करावी, टॅक्स असेल, एलबीटी असेल, बाजार असेल, जाहिरात असेल, स्थावर असेल या सर्व रेव्हेन्यु विभागाची चौकशी लावावी, जेणेकरुन या विभागाचा जो भ्रष्टाचार आहे, असा माझा आरोप आहे, कोणी केला काय केला याची नावे समितीने शोधावी, जेणेकरुन महानगरपालिकेत विकास कामाकरिता आपण सांगतो तो निधी नाही, दुसरीकडे टॅक्स जमा होत नाही, पाण्याचे बील जमा होत नाही, एकीकडे आपण विकास काम थांबवितो आणि दुसरीकडे आपल्या विभागाकडे आयुक्तांचे लक्ष नाही,अति.आयुक्तांचे लक्ष नाही, त्यामुळे माझी आपल्याला सभागृहाच्या माध्यमातुन विनंती आहे कि, ज्येष्ठ सदस्यांची समिती नेमुन महिन्याभराच्या आंत या विषयाची चौकशी करुन तोपर्यंत त्यांना नियमाप्रमाणे कसे बाजुला करता येईल, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविता येईल, किंवा त्यांना निलंबित करता येईल, जो काही करता येईल, नियमाप्रमाणे आपण याची चौकशी करावी, अशी माझी लक्षवेधीच्या माध्यमातून विनंती आहे.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात मा.आमदार महोदयांकडुन तक्रार प्राप्त झाली होती त्या अनुषंगाने विभाग प्रमुखांकडुन याबाबतचा खुलासा मा.आयुक्तांच्या निदशर्नाप्रमाणे मागविण्यांत आला आहे. त्यांचा जो खुलासा प्राप्त झालेला आहे त्यामध्ये क्षेत्रीय स्तरावर काही प्रकरणामध्ये अश्याप्रकारच्या अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. त्या अनुषंगाने गौरीशंकर रहाटे यांना या कार्यालयातर्फे दि.२३.०३.२० रोजी निलंबित करण्यांत आलेले आहे. त्याचप्रमाणे धनराज हेमाणी यांच्या विरोधात शिस्तभंग कार्यवाही करण्याबाबत मा.आयुक्तांनी निर्देश दिले आहे. त्याचबरोबर तक्रारीत नमुद श्री सचिन मेश्राम, करसंग्राहक यांच्या.....

महापौर :- श्री जैन साहेब आपण पुन्हा उच्चारीत करावे, कारण मधल्या काळात आपली आवाज बरोबर येत नव्हती.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, मा.आमदार महोदयाकडुन या विषयाच्या अनुषंगाने ज्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्या अनुषंगाने निगम आयुक्तांव्दारे विभाग प्रमुखांचा खुलासा मागविण्यांत आला आहे. सदर खुलाशा प्राप्त झाल्यानंतर विभागाकडुन अशी माहिती प्राप्त झालेली आहे की क्षेत्रीय स्तरावर अशी अनियमीतता झाल्याची बाब प्रथमदर्शनी निर्देशनास आलेली आहे.

महापौर :- पुन्हा आवाज येत नाही आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मला बोलावयाचे आहे, एक तर यांचा आवाज येत नाही, मला आपणांस विनंती आहे कि या विषयाच्या संदर्भात चौकशी समिती लावावी.

उपायुक्त (श्री.निर्भय जैन) :- मा.महापौरजी, विषयांकीत प्रकरणी मा.आमदार महोदयांकडुन तक्रार प्राप्त झाली होती, त्या अनुषंगाने मा.आयुक्तांव्दारे विभाग प्रमुखांकडुन खुलासा मागविण्यांत आलेला आहे, सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर विषयांकित तक्रारीच्या अनुषंगाने अशी माहिती प्राप्त झालेली आहे कि, क्षेत्रीय स्तरावर या तक्रारीच्या अनुषंगाने काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याअनुषंगाने हनुमाननगर झोनचे कनिष्ठ निरीक्षक श्री गौरीशंकर रहाटे यांना निलंबित करण्यांत आलेले आहे, त्याचबरोबर श्री धनराज हेमणे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांच्या विरोधात शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येत आहे. त्याचबरोबर श्री सचिन मेश्राम, करसंग्राहक, हनुमाननगर झोन यांच्या संदर्भात मा.आमदार महोदयांनी जी १२०० ते १३०० प्रकरणात अनिमियतता झाल्याची बाब नमुद केली होती त्या अनुषंगाने याच्यात चौकशी सुरु आहे, त्याचबरोबर या तक्रारीच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर जी काही अनियमितता निदर्शनास आलेली आहे, त्या अनियमिततेची माहिती सायबरसेल कडे व पोलिस विभागाकडे तक्रार करण्यांत आलेली आहे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सुध्दा याही अनियमिततेचा तपास व्हावा यासाठी सदर माहिती पोलिस विभागाला उपलब्ध करुन देण्याबाबत मा.आयुक्त यांनी निर्देशित केलेले आहे आणि ती माहिती पोलिस विभागाला देण्यांत येत आहे. जेणेकरुन यामध्ये सुध्दा सखोल चौकशी करता येईल, त्याचबरोबर या तक्रारीच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर ज्या काही अनियमितता झालेल्या आहेत त्याबाबत कर विभागाच्या कार्यपध्दतीत साफ्टवेअरच्या बाबतीत असो किंवा असेसमेंटच्या बाबतीत असो, त्यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक असल्याने याबाबत अभ्यास करुन या सुधारणा प्रस्तावित करण्याबाबत मा.आयुक्तांनी निर्देश दिलेले आहे. याच्यामध्ये आणखी काही लोकांचे खुलासे मागविण्यांत आलेले आहे, ते खुलासे प्राप्त झाल्यानंतर याच्यामध्ये कोणाकोणाचा सहभाग आहे, त्याबाबत अधिक चौकशी झाल्यानंतर यावर सुध्दा कार्यवाही करण्याबाबत मा.आयुक्तांनी निर्देशित केलेले आहे.

श्री.प्रविण दटके -: मा.महापौरजी, खडगी नावाच्या कर्मचा-यांला आपण ससपेंड केले आहे, त्या कर्मचा-यांनी स्वत: सायबरसेलला तक्रार केली आहे, महानगरपालिकेनी तक्रार करायच्या आधी त्या कर्मचा-यांनी स्वत:हुन सायबरसेलला तक्रार दिलेली आहे या सगळया गोष्टीची आणि आपल्या महानगरपालिकेत इतके महान अधिकारी आहे, त्या एकटया कर्मचा-यांवर कार्यवाही केली, ज्यांनी स्वत:हुन पोलिसमध्ये तक्रार केली त्यांच्यावर आपण कार्यवाही केली. माझी आपणांस विनंती आहे कि संबंधित विषयाची चौकशी सभागृहाच्या एका ज्येष्ठ मा.सदस्यांकडुन समिती तयार करुन करावी तोपर्यंत या विभागाच्या अधिका-यांची बदली करावी, सहा.आयुक्त असतील, किंवा उपायुक्त असतील त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, आणि पुढच्या सर्वसाधारण सभेच्या आधी याचा

अहवाल मागविण्यांत यावा. एकीकडे विकासाशी संबंधित विषयात आपले आयुक्त सांगतात कि आमच्याकडे विकास कामाकरिता पैसे नाही, आणि दुसरीकडे आपले कर्मचारी २० कोटी रुपयांवर आपल्या तिजोरीवर डल्ला मारीत आहे. मा.महापौरजी, माझी आपणांस विंनती आहे कि सभागृहाच्या ज्येष्ठ मा.सदस्यांच्या अध्यक्षतेखाली त्याच्यात अधिकारी पण असावे एक समिती बनवावी व पुढच्या साधारण सभेच्या आंत या विषयाची निट चौकशी करुन त्याचा अहवाल मा.महापौरांना द्यावा तोपर्यत या विभागाचे जे अधिकारी असतील एकतर त्यांची बदली करावी किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी माझी आपणांस विनंती आहे.

श्री.कमलेश चौधरी :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, अगर हमे एक विषय के संदर्भ मे माहिती देना है या माहिती लेना है तो हम किस आधार पर इस विषय की माहिती ले सकते है, हमे इस विषय पर कुछ बोलना है, लैकिन इसमे हम सहभागी नही हो पारहे है.

महापौर :- जिन सदस्यो को इस विषय पर चर्चा करना है वह अपना हात ऊपर उठाये, हात ऊपर उठाने के बाद उनको अनुमती दी जायेगी, निगम आयुक्तांनी या विषयावर निवेदन करावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आयुक्तांच्या निवेदनाच्या आधी उपमहापौरजी आपल्या बाजुला बसले आहे, त्यांनी पुर्ण प्रकरण मला आणुन दिले आहे, त्यांना निवेदन करु देण्यांत यावे, अशी माझी आपणांस विनंती आहे.

महापौर :- मान्यवर, लक्षवेधीमध्ये ज्यांचा विषय आहे त्यांच्याशिवाय दुस-याला बोलण्याची संधी नाही. मा.आयुक्त महोदयांनी या विषयावर निवेदन करावा. दटके साहेब आपण तो विषय उच्चारण केले तर काहीच हरकत नाही.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.उपमहापौरजीनी माझ्यायाकडे एक तक्रार दिली आहे, लकडगंजमध्ये जाधव नांवाचे एक इंस्पेक्टर होते, आणि एक बहादुरे नावाचे अधिकारी अशी दोन नांवे माझ्याकडे आहे याही प्रकरणाची सखोल चौकशी या समितीच्या माध्यमातुन करावी.

श्री कमलेश चौधरी :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, इस विषय पर मुझे बोलना है,

महापौर :- मा.कमलेशजी लक्षवेधी मे आप चर्चा मे भाग नही ले सकते. ऐसा नियम है. इसलिये आपके पाईंट ऑफ आर्डर को नकारा जाता है. मा.सदस्य, श्री दटके यांनी उपमहापौरांना निवेदन करण्यास सांगीतले होते मी नकारले आहे, ज्या मा.सदस्यांची लक्षवेधी आहे, त्याच्याशिवाय दुसरा मा.सदस्य या विषयावर चर्चा करु शकत नाही. निगम आयुक्तांनी त्यांचे निवेदन करावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मा.सदस्य, श्री दटके साहेबांनी टॅक्सच्या संदर्भात जी तक्रार उपस्थित केलेली आहे त्या अनुषंगाने आतापर्यंत जी कार्यवाही झालेली आहे त्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्तांनी आपल्या समोर दिलेली आहे. मी याठिकाणी दोन तीन महत्वाचे मुद्दे या प्रकरणासंदर्भात सांगतो. मा.सदस्य,श्री दटके साहेब यांनी जो विषय ठेवला आहे त्याच्यावर प्रशासनाकडुन गंभीरतेने लक्ष घालण्यांत आले आहे, हे मी सभागृहामध्ये सांगतो. याच्यामध्ये कोणतीही गोष्ट शिल्लक न ठेवता, यामध्ये प्रत्येक गोष्टीवर सविस्तर पणे चौकशी करण्याची आवश्यकता आहे. यापध्दतीची भुमिका घेतली आहे याबाबत मी डिटेलमध्ये निर्देश दिले आहे, आज आपल्याकडे स्टॉफची कमी असल्यामुळे काही ठिकाणी टॅक्स कलेक्टरला अधिकार देण्यांत आले होते. काही ठिकाणी टॅक्स इंस्पेक्टरकडे चार्ज दिल्यानंतर सुध्दा हया प्रकरणामध्ये कॉम्प्लेक्स मुद्या आहे. जर एका व्यक्तिकडे १५००-१७०० प्रकरणे सांगण्यात आली आहे, माझ्या मते याच्यामध्ये सखोल चौकशी आपण करणार आहे दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे याच्यामध्ये सायबर गुन्हा देखील दाखल झालेला आहे याठिकाणी एका पर्टीकुलर केसचा विचार न करता ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता भासेल त्या सगळया केस सायबरसेलमध्ये दाखवले पाहिजे, सायबर सेलच्या अनुषंगाने

सखोल चौकशी यामध्ये होवु शकते. अश्या मी सूचना दिलेल्या आहे. तिसरा महत्वाचा विषय याच्यामध्ये आयटी विभागाची जेव्हापासून याच्यामध्ये आपण संगणीकृत प्रणाली आणली होती, तेव्हापासून या सगळया गोष्टीचे आपण डिसेंट्रालायझेशन केले आहे. याची संपुर्ण कार्यवाही करावयाची आहे, एखाद्या व्यक्तिचे कमी झाले म्युटेशनमध्ये टॅक्स जास्त झाले, या सगळया अडचणी दुर होण्याच्या दृष्टीकोणातुन मागच्या काळामध्ये असे अधिकार आपण एसई ला दिलेले आहे. जसे मा.दटके साहेबांनी म्हटल्याप्रमाणे रहाटेच्या केसमध्ये निदर्शनास आले होते कि, तो एका प्रभागाचा असून दुस-या प्रभागामध्ये त्यांनी कार्यवाही केलेली आहे. आयटीला याच्यामध्ये एक सिस्टीमेटीक इम्प्रुव्हमेंट करण्याची आवश्यकता आहे. एकंदरीत या प्रकरणाची प्रशासनानी गंभीर स्वरुपात दखल घेतलेली आहे, सभागृहाला मी आश्वासन देवु इच्छितो याच्या संदर्भात मी कोणाला सोडणार नाही, मागच्या कालावधीमध्ये नॉट ओनली हनुमाननगर, नॉट ओनली गांधीबाग झोन प्रत्येक प्रभागामध्ये ज्या ज्या ठिकाणी अश्याप्रकारचे रेट कमी करण्यांत आलेले आहे, त्याठिकाणी तातडीने स्थगती देवुन प्रत्येक केस टु केस अभ्यास करुन लक्षात आल्यानंतर मेरीटप्रमाणे त्याच्यावर निर्णय घ्यावयाचे आहे. यासाठी एसईला सर्कुलर निर्गमित करणार आहे. मा.दटके साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अतिशय प्रॉपर मुद्दा आहे, तो मुद्दा सात दिवसामध्ये या प्रकरणाची चौकशी करणे क्लीष्ट मुद्दा आहे. यामध्ये थोडा वेळ देवुन प्रॉपरली आपण या विषयाची चौकशी केल्यास जे कोणी दोषी आहे त्यांच्यावर कार्यवाही करता येते, ज्या काही आपणांस याच्यात सुधारणा करावयाच्या आहे त्या सुधारणा पण आपण करणार आहोत. आणि जेथे दुस-या इंटेंशनमध्ये त्यांनी कार्यवाही केली असेल त्याच्यावर आपण नक्की जो दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही करणार आहे. एकंदरीत सांगीतल्याप्रमाणे आपण हा विषय सभागृहासमोर आणु शकतो. जसे मी सांगीतल्याप्रमाणे यामध्ये आपल्याला केस टु केस जाणे आवश्यक आहे. आम्ही याच्यामध्ये सर्व मुद्यांची तपासणी करणार आहे, त्यानंतर हा विषय सभागृहासमोर प्रशासन आणुन देईल.

श्री प्रविण दटके :- आवाज नाही आला.

महापौर :- दटकेजी आपका आवाज नही आ रही है इसलिये यह सभा १० मिनिट के लिये स्थगित की जाती है, कृपया तब तक यह जो टॅक्नीकल अडचण निर्माण हो रही है उसे दुर करे उसके पश्चात हम सभा शुरु करेंगे.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**